*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

**अभ्यासक्रम**

1. ज्ञानाचे स्वरूप आणि संकल्पना



2. ज्ञानाचे मार्ग

**अ) भारतीय:** प्रत्यक्ष, अनुमान, शब्द

**ब) पाश्चात्य :** इंद्रियानुभव, विवेकबुद्‌धि

Unit 2

Epistemology

**घटक 2 :**

**ज्ञानमीमांसा**



---

**प्रस्तावना -**

''तत्त्वज्ञान' या विषयाचा परिचय करुन घेताना ''तत्त्वज्ञान म्हणजे काय ?'' हा प्रश्न मूलभूत प्रश्न आहे, असे आपण म्हंटले आहे. या प्रकरणात आपण 'तत्त्वज्ञान' या संज्ञेतील 'ज्ञान' या संकल्पनेचे स्वरुप पाहणार आहेत.

आपण आपले स्वत:चेच सूक्ष्म निरीक्षण केले तर असे लक्षात येईल की प्रत्येक क्षणाला आपल्याला कोणते तरी नवे ज्ञान प्राप्त होत असते. अर्थात आपले मन, बुद्‌धि व ज्ञानेंद्रीये त्या ज्ञानप्राप्तीच्या क्षणाला सजग असली पाहिजेत. अगदी, ''आत्ता किती वाजले आहेत ? '' अशा कायम ताज्या व नव्या प्रश्नातून सुध्दा दर क्षणाला नवे ज्ञान मिळते. हे दृश्य, मूर्त जग अथवा अमूर्त भावभावना, विचार, संकल्पना इत्यादींचे आपणास सततच ज्ञान मिळत असते. ते मिळाले की कुणाला तरी सांगावे असे वाटते.

पण दरवेळी ज्ञानच होईल, असे नसते.कधी कधी भास होतो. तिलाच भ्रम , भ्रांति असेही म्हंटले जाते. अंधारात चालताना आपणास अचानक साप दिसतो. आपण दचकून पाय मागे घेतो. नंतर कळते की ती दोरी आहे . मग साप कोठे गेला ? सापाचे ज्ञान झाले होते की भास? आणि भास असेल तर मग आपण घाबरलो का ? पाण्यातील काठी वाकडी दिसते. काठी पाण्यात वाकडी बनते आणि पाण्याबाहेर सरळ असते, असे असते का ? काठीचे होणारे कोणते ज्ञान खरे कोणते खोटे की नुसताच भास ? सूर्य उगवतांना - मावळतांना दिसतो. आता उगवणे मावळणे या घटना खऱ्या आहेत की भास ? ''उगवणे आणि मावळणे'' ही भाषा योग्य की अयोग्य ? असे अनेक ज्ञानविषयक प्रश्न निर्माण होतात.मग या सर्वात फरक करण्यासाठी 'ज्ञान'या संकल्पनेची **चिकित्सा** करावी लागते. ते काम तत्त्वज्ञान करते.

ज्ञान म्हणजे काय ? त्याचे स्वरुप कसे असते ? ज्ञानाचा उगम कसा होतो? त्याचा निकष कोणता ? ज्ञान आणि भास यात फरक काय आहे ? ज्ञानाची प्रक्रिया कशी आकार घेते ? आपल्याला जे काही ज्ञान होते ते कोणत्या साधनांनी होते, आपल्याला मिळणारे ज्ञान कोणत्या परिस्थितीत खऱ्या अर्थाने ज्ञान मानता येईल ? ज्ञानाचे प्रकार कोणते ? ज्ञानाची सत्यता कशावर अवलंबून असते? तत्त्वज्ञानातील महत्वाचे प्रश्न आहेत. या समस्यांचा अभ्यास करणारी तत्त्वज्ञानाची शाखा म्हणजे ज्ञानमीमांसा[1] होय. ज्ञानमीमांसा ही शाखा मुख्यत: ज्ञानाचे स्वरुप,प्रकार,ज्ञानाचा मार्ग,ज्ञानाच्या मर्यादा आणि निकष यांचा, म्हणजेच पुढील समस्यांचा अभ्यास करते :

---

[1] (अ) ज्ञानमीमांसा (**Epistemology**) ही तत्त्वज्ञानाची शाखा ज्ञानविषयक समस्यांचा अभ्यास करते.इंग्लीशमधील **Epistemology** ही संज्ञा *Scottish Philosopher* ***James Frederick Ferrier (1808–1864)*** या तत्त्ववेत्त्याने 1856 मध्ये प्रथम प्रचारात आणली. Greek भाषेत *episteme* = science आणि *logos* = knowledge or explanation, असा अर्थ होतो, म्हणून *the science of knowledge is epistemology* अशी व्याख्या होते. the science of म्हणजेच "theory of knowledge,").

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

1. ज्ञान म्हणजे काय ? - *ज्ञान ही संकल्पना*
2. ज्ञान कसे मिळते ? - *ज्ञानाची साधने*
3. ज्ञान कसे होते ? - *ज्ञानाची प्रक्रिया*
4. ज्ञानाचा निकष - *ज्ञानाची वस्तुनिष्ठता*
5. "आपल्याला ज्ञान झाले आहे" , याचेच ज्ञान कसे होते ? - *ज्ञानाचे ज्ञान*

**तीन घटक :**

ज्ञानप्रक्रियेत ज्ञाता,ज्ञान व ज्ञेयवस्तू असे तीन घटक असतात.



1. ज्ञेयवस्तू म्हणजे ज्याचे ज्ञान होते ती वस्तू - (Object of Knowledge).
2. ज्ञाता म्हणजे ज्यास ज्ञान होते ती व्यक्ती - (Knower)
3. ज्ञान म्हणजे ज्ञाता व ज्ञेयवस्तू यांच्यातील आंतरसंबंध (Knowledge ) .

भारतीय परिभाषेत सांगावयाचे तर पुढीलप्रमाणे मांडता येईल :

1. जे दिसते (पाहण्याचा विषय) - **' दृश्य '** = ज्ञेयवस्तू
2. दृश्य पाहणारी व्यक्ति ती - **' द्रष्टा '** = ज्ञाता.
3. द्रष्ट्याला जे दिसते किंवा होते ते **'दर्शन'** = ज्ञान.

'ज्ञान होते', म्हणजे या तिन्हीत नेमकी कोणती घटना घडते, हे स्पष्ट होणे आवश्यक असते.या सर्व प्रक्रियेच्या स्वरूपाची, ती प्रक्रिया पूर्ण होण्याच्या अटी, त्यातील अडथळे आणि ते दूर करण्याचे मार्ग व सत्यज्ञानाकडे जाण्याचा मार्ग इत्यादी समस्यांची चर्चा करते ती **ज्ञानमीमांसा**.

थोडक्यात ज्ञान - अज्ञान,सत्य असत्य ज्ञान व भास आणि भ्रम तसेच संपूर्ण ज्ञानप्रक्रिया, या सर्व संकल्पना स्पष्ट करण्याचे काम ज्ञानमीमांसा करते. म्हणून थोडक्यात "***'ज्ञान' या संकल्पनेचे स्वरुप, प्रकार, ज्ञानाचा उगम, ज्ञानाचे प्रामाण्य आणि ज्ञानाची मर्यादा यांचा अभ्यास करणारी तत्त्वज्ञानाची शाखा म्हणजे ज्ञानमीमांसा होय.***"

## 1) ज्ञानाचे स्वरूप आणि व्याप्ती :

**प्रस्तावना:**

### माहिती व ज्ञान (Information and knowledge)

साधारणत: माहिती व ज्ञान (Information and knowledge यात फरक केला जात नाही पण तत्त्वचिंतक मात्र तो फरक करतो. विशेषत: आजच्या *तंत्रज्ञान माहितीयुगात (Age of Information & Technology)* माहितीलाच ज्ञान समजले जाते.पण ते चूक आहे. कारण तत्त्वज्ञानात्मक दृष्टिने पाहता ज्ञान म्हणजे समर्थनीय सत्य विश्वास.आणि माहिती म्हणजे *केवळ माहिती* की जी दिली जाते पण जिचे समर्थन केले जातेच, असे नाही. त्यामुळे अशी माहिती असत्य ज्ञान देवू शकते.

---

**(ब)** Greek भाषेतील episteme चा अर्थ "knowledge असा आहे. episteme हा शब्द epistasthai पासून बनतो. epistasthai म्हणजे "know how to do, understand," . यात epistasthai चा अर्थ - "over stand," म्हणजे शब्दश: वर उभे राहाणे. यातील epi म्हणजे "over, near" , आणि histasthai म्हणजे "to stand." म्हणून "The scientific (as opposed to philosophical) study of the roots and paths of knowledge is *epistemics*", असे म्हंटले गेले. म्हणून **Epistemology** म्हणजे ***ज्ञानाच्या मूळाचा शोध घेणे***. हा व्युत्पत्तीशास्त्रीय अर्थ वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट करतो.म्हणून ज्ञानाच्या मार्गाला **Epistemology** असे म्हणतात.हा अर्थ अंदाजे 1969 मध्ये निश्चित करण्यात आला. संदर्भ : http://dictionary.reference.com/browse/epistemology.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

किती वाजले याचे उत्तर घड्याळ बघून देता येते पण किती कसे वाजतात?,याचे खरे उत्तर खगोलशास्त्रज्ञच देऊ शकतो. किती वाजले ? याचे उत्तर देणे, म्हणजे पृथ्वीचे सूर्याभोवती फिरण्याचे अवकाशातील स्थान स्पष्ट करणे. या अर्थाने आधीचे स्थान अथवा नंतरचे स्थान सांगणे याचाच अर्थ भूतकाळ व भविष्यकाल सांगणे होय. पण तत्त्वज्ञ या पलिकडे जावून 'काल म्हणजे काय ? असा प्रश्न विचारतो आणि 'काल' ही संकल्पनाच स्पष्ट करतो. आपल्या शरीराची उंची, वजन, रंग. इ. आपणास 'माहिती' असते.डॉक्टरला मात्र 'ज्ञान' असते.अन्नात चवीसाठी मीठ टाकावे, ही माहिती असते पण 'किती' टाकावे हे ज्ञान असते. अशा रितीने ज्ञान व माहिती यात फरक करावा लागतो.ज्ञानात माहितीचे विश्लेषण, स्पष्टीकरण, वर्गीकरण करणे, समर्थन करणे अभिप्रेत असते.ते माहितीत केले जात नाही. माहितीलाच ज्ञान मानले जावून विश्वास ठेवला जातो, त्यातूनच अंधश्रध्दा निर्माण होते. ज्ञान त्या नाहीसे करते.



## ज्ञानाचे स्वरूप : -

### ज्ञान म्हणजे समर्थनीय सत्य विश्वास (Knowledge as justified true belief)

### समर्थन, सत्यता आणि विश्वासार्हता यातील फरक :

ज्ञानमीमांसा मुख्यत: ''ज्ञान ही संकल्पना आणि तिचे समर्थन'' यावर भर देते, हे म्हणणे ासमजावून घेण्यासाठी ज्ञानाच्या स्वरुपाचे विश्लेषण करणे आणि या ज्ञानाचा (1)सत्य (2)विश्वास आणि (3)समर्थन या, तीन संकल्पनांचा 'ज्ञान ' या संकल्पनेशी नेमका कोणता संबंध आहे, ते स्पष्ट करणे आवश्यक आहे.हा संबंध समजला तरच ज्ञानाची निर्मिती कशी होते, ते आपल्या जीवनात कसे उपयोगी पडते, त्याचे आकलन होईल.त्यासाठी या तीन संकल्पनांचे स्वरुप पाहू आणि त्यानंतर त्याविषयी तत्त्ववेत्त्यांनी मांडलेले विचार पाहू.

बहुधा असे घडते की बोलणारी व्यक्ति तिला उपयोगी असणाऱ्या गोष्टीवर 'विश्वास' ठेवते. पण ज्ञानमीमांसेत अशा प्रकारचा विश्वास कामाचा नाही. ज्ञानमीमांसेच्या मते 'एखाद्या गोष्टीवर विश्वास ' ठेवणे याचा अर्थ असा की जे सांगितले गेले आहे ते **'सत्य'** असले पाहिजे. उदाहरणार्थ,समजा एखादी व्यक्ति ाअसे म्हणाली की ''आकाश निळे आहे.'' तर या बोलण्यावर विश्वास का ठेवावा ? कारण या वाक्यात जे सांगितलेले आहे,तशी वस्तुस्थिती आहे, त्या वस्तुस्थितीविषयी केलेले हे विधान सत्य आहे. आकाशाविषयी केले गेलेले ते विधान तत्त्वज्ञानाच्या भाषेत ***सत्य विधान*** आहे.

याचा अर्थ असा की '' 'आकाश निळे आहे', *हे विधान सत्य आहे* '' असे ते संपूर्ण म्हणणे असते. बोलणारी व्यक्ति तेच म्हणणे विधानामधून स्पष्ट करीत असते. "आकाश निळे आहे", हे मी जाणतो पण विश्वास ठेवत नाही " *असे विधान ती करु शकत नाही.* कारण तसे म्हणणे चुकीचे, आत्मव्याघाती ठरेल.तसे विधान केल्यास ते विधान असत्य ठरते, त्यामुळे त्या विधानावर विश्वास ठेवता येत नाही.ते स्वीकारता येत नाही.

त्याउलट विश्वसनीय विधानातील सत्यता नाकारता येत नाही.जसे की '' ''*मला ज्योतिष्याविषयी माहिती आहे, पण मी त्यावर विश्वास ठेवत नाही '', हे विधान सत्य आहे ''* असे म्हणता येते. ते स्वीकारता येते.किंवा असेही असू शकते की एखाद्याचा भविष्यशास्त्रावर विश्वास असतो पण त्याला त्याचे काहीच ज्ञान नसते ! याचा अर्थ असा की विश्वास ही व्यक्तिच्या वर्तनाचा अगदी ***खासगी*** *आधार* असतो.त्या संबंधित व्यक्तिशिवाय इतरजन *तो विश्वास स्वीकारतीलच असे नाही.* पण **सत्यता** मात्र सर्वांना मान्य असते.आणि तसे सत्य विधान स्वीकारले जाईल, अशी **सार्वत्रिक बाब** असते.

सत्य विषयक आणखी थोडी माहिती आवश्यक आहे.सत्य असणे म्हणजे सत्यता असणे.सत्यता हा विधानाचा गुण असतो, वस्तुस्थितीचा नाही.एखादी वस्तुस्थिती सत्य आहे, याचा अर्थ त्या वस्तुस्थितीविषयी केलेले विधान सत्य असणे. म्हणजे **विधानात सांगितलेली, व्यक्त केलेली वस्तुस्थिती वास्तवात असणे, म्हणजे सत्यता असणे**.त्यामुळेच सत्यता हा विधानाचा निकष बनतो.असे सत्य विधान जी वस्तुस्थिती सांगते तशी ती असेल तरच ते विधान सत्य असते.

आणि विधान सत्य असेल तरच ते ज्ञान असते, अन्यथा ते अज्ञान असते.सूर्य पूर्वेला उगवतो,हे विधान सत्य आहे. कारण तशी वस्तुस्थिती आहे.

थोडक्यात **सत्य विधान म्हणजे ज्ञान होय.**

सत्याच्या आधारे विधानाची ज्ञानात्मकता सिध्द करणे म्हणजे ज्ञानाचे समर्थन करणे होय. म्हणूनच एखादे विधान उपयोगी पडते,यश मिळवून देते म्हणून ते विधान सत्य असते, असे नाही. ''वस्तू (उदा.मोबाईल) तपासून घेणे,नंतर तक्रार चालणार नाही '' असे विक्रेता म्हणतो तेंव्हा तो विश्वास ठेवता येईल असे सत्य विधान करीत नसतो तर संशयास्पद विधान करीत असतो.ते विधान कदाचित त्याला उपयोगी पडेल पण सार्वत्रिक सत्य म्हणून इतर माणसे (ग्राहकवर्ग) ते विधान स्वीकारु शकत नाही (म्हणजे असा व्यवसाय अविश्वासू ठरेल, तो बंद करावा लागेल.)

4

ज्ञान म्हणजे समर्थनीय सत्य विश्वास[2] असतो, असे म्हणण्याचाच अर्थ ज्ञानाचे मार्ग आणि त्या मार्गाचे समर्थन करता येणे होय.पारंपरिक दृष्ट्या ज्ञानाचे चार मार्ग आहेत :

(1) पंच ज्ञानेंद्रिये
(2) स्मृति (स्मरणशक्ति)
(3) आत्मपरीक्षण आणि
(4) बुद्‌धि.

हे मार्ग स्वीकारता त्यातून दोन वाद तत्वचिंतनाच्या परंपरेत निर्माण झाले.
अ) पहिला मार्ग : अनुभववाद (Empiricism) - पंच ज्ञानेंद्रियाचा मार्ग म्हणजे प्रत्यक्ष अनुभव घेणे असते.
ब) दुसरा मार्ग: बुध्दिवाद (Rationalism) - बुद्‌धिचा मार्ग म्हणजे विचार करणे, त्यातून ज्ञानप्राप्ती होते .

अनुभववादातून भौतिकतावाद, जडवाद निष्पन्न होतात तर बुध्दिवादातून चिद्‌वाद, चेतनावाद, आत्मावाद निष्पन्न होतात.आपण आता, ज्ञान कसे प्राप्त होते, या विषयी भारतीय आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानातील पंरपरेतील विविध तत्त्ववेत्त्यांची आणि विविध परंपरांची मते पाहू.

## अ) भारतीय ज्ञानाचे मार्ग : प्रत्यक्ष, अनुमान, शब्द

## (1)प्रत्यक्ष

### प्रस्तावना

**प्र**त्यक्ष, अनुमान, शब्द हे तीन ज्ञानाचे मार्ग आपण अभ्यासणार आहोत. या मार्गांची सविस्तर चर्चा भारतीय तत्त्वज्ञानातील 'न्याय दर्शन' या तात्त्विक विचार मांडणाऱ्या दर्शनाने केली आहे. ती इतकी महत्वाची आणि मूलभूत आहे की नंतरच्या सर्व दर्शनांनी ती स्वीकारली आहे.

**मे**धातिथी गौतम ऋषि (इ.स.पू.550) हे न्याय दर्शनाचे प्रणेते होते. '*न्यायसूत्रे* ' हा न्यायदर्शनाचा मूळ ग्रंथ आहे. न्याय शब्दाचा अर्थ 'उभय पक्षांना मान्य असणारा निर्णय. '*नीयते अनेन इति न्याय:* ' अशी न्यायाची व्याख्या आहे. त्याचा अर्थ ''जो आपल्याला निष्कर्षाकडे नेतो तो न्याय ''. हा न्याय कसा मिळवावा किंवा कसा मिळतो,याचेच मार्गदर्शन न्याय दर्शन करते. न्याय दर्शनात ज्ञानाची मीमांसा महत्वाची आहे.

[2]ज्ञान म्हणजे समर्थनीय सत्य विश्वास या सिध्दान्तावर विसाव्या शतकात एडमंड गेटीएर **Edmund L. Gettier III** (born 1927 in Baltimore, Maryland) या ॲंग्लोअमेरिकन तत्ववेत्त्याने वेगळ्या भूमिकेतून टीका केली आहे.त्याने या संदर्भात 1963 साली केवळ तीन पानी "Is Justified True Belief Knowledge?" या नावाचा निबंध लिहिला.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

न्याय दर्शन दर्शन ज्ञानाचे दोन प्रमुख प्रकार करते.यथार्थ आणि अयथार्थ. यथार्थ ज्ञान म्हणजे ‘*प्रमा*’ आणि अयथार्थ ज्ञान म्हणजे ‘*अप्रमा*’. हे ज्ञान अनुभव आणि स्मृति या मार्गांनी होते.अनुभव म्हणजे ज्ञानेंद्रियांचा विषयाशी प्रत्यक्ष संबंध येणे.स्मृति म्हणजे ते ज्ञान व संस्कार यांचे संमिश्रण होय. अनुभव बाह्य जगाचा किंवा आंतरिक मानसिक भावांचा असतो. ‘ज्ञान’ या संज्ञेचे तीन पर्यायी शब्द म्हणजे बुध्दी, उपलब्धी व पर्याय हे आहेत.

## 1. प्रमाणाची व्याख्या आणि वर्गीकरण

**प्रमाणाची व्याख्या :**



न्याय दर्शनाच्या मते, आपणास मिळणारे ज्ञान नेहमी यथार्थच, सत्यच असते. ते ज्ञान मिळविण्याचे साधन म्हणजे ‘ *प्रमाण* ’ होय. न्याय दर्शनाच्या मते ज्ञान मुख्यत: जगाचे ज्ञान असते. मिळालेले ज्ञान इतरांना देण्याची आपली इच्छा असते.त्यावेळी ते भाषेत मांडावे लागते.त्यासाठी भाषा तयार करणे आणि भाषेची रचना करणे,ही कामे करावी लागतात. भाषेचे मुख्य काम जगाचे वर्णन करणे हेच असते,असे न्याय दर्शनाचे मत आहे.म्हणूनच भाषा आणि जगाची रचना एकास एक किंवा पूरक असावी लागते.जगाचे ज्ञान मिळविण्याच्या साधनास न्यायदर्शन ***प्रमाण*** म्हणते. अशी चार प्रमाणे हे दर्शन स्वीकारते.

**प्रमाणाचे वर्गीकरण : चार प्रमाणे**

(1) प्रत्यक्ष (2) अनुमान
(3) उपमान (4) शब्द .

**प्रत्यक्ष प्रमाणाचे स्वरूप :**

प्रत्यक्ष म्हणजे ज्ञानेंद्रियांनी मिळणारा प्रत्यक्ष अनुभव.त्यास ‘प्रत्यक्ष’ म्हणण्याची प्रथा आहे. प्रत्यक्षाची वैशिष्टये अशी :

1) ***साक्षातता* :** प्रत्यक्षज्ञान नेहमीच साक्षात असते,ते कधीही कशाच्याही मदतीने, कोणत्याही माध्यामाद्वारे होत नसते.’’ ज्ञानाकरणम् ज्ञानम् प्रत्यक्षम् ’’ अशी प्रत्यक्षाची व्याख्या केली जाते.
2) ***‘इंद्रियार्थ सन्निकर्ष ’* :** प्रत्यक्षज्ञान नेहमी इंद्रियांच्याच साहाय्याने होते.इंद्रिये व अर्थ (वस्तू) यांचा संनिकर्ष हेच प्रत्यक्षप्रमाण होय. इंद्रियांचा ज्ञानविषयाशी थेट संबध येतो. या संबधाला न्यायदर्शनकार *’इंद्रियार्थ सन्निकर्ष ’* असे म्हणतात. इंद्रिय + अर्थ + संनीकर्ष = इंद्रियार्थ संनिकर्ष.संनिकर्ष म्हणजे एकमेकांस भिडणे. वस्तूचे ज्ञान होते म्हणजे माझे इंद्रिय त्याच्याशी भिडलेले असते.त्याचवेळी त्याचा अर्थ कळतो.हाच *’इंद्रियार्थ सन्निकर्ष’ चा अर्थ* होय.’’इंद्रियार्थ सन्निकर्षजन्यम् ज्ञानम् प्रत्यक्षम् ’’ अशी व्याख्या केलेली आहे.
3) ***ज्ञानेंद्रिये:*** आपली ज्ञानेंद्रिये एकूण पाच आणि ‘मन’ हे सहावे इंद्रिय न्यायदर्शनकार मान्य करतात. बाह्य अनुभव नाक,कान,डोळे इत्यादी ज्ञानेंद्रियांनी येतो तर आंतरिक अनुभव मन (मनस्) या इंद्रियाने येतो.
4) ***ज्ञानविशिष्टता* :** प्रत्यक्ष होणारे ज्ञान नेहमी विशेषच ज्ञान असते.कारण ते विशिष्ट इंद्रियाकडूनच लाभणारे विशिष्ट विषयाचे ज्ञान असते. ज्ञान कधीही ‘सामान्य ’ असे नसते.सामान्य ज्ञान होण्यासाठी तशा प्रकारचे इंद्रियच नाही !
5) ***आत्म्याचा विशेष गुण* :** ज्ञान हा आत्म्याचा विशेष गुण आहे.ज्ञान इंद्रियामार्फत होत असले तरी ते इंद्रियांना होते, तर आत्म्याला होत असते.म्हणून ज्ञान हा आत्म्याचा विशेष गुण आहे. हा आत्मा सर्वव्यापी व नित्य, नेहमी ज्ञानयुक्त म्हणजे नेहमी जागृत असणारा, ज्ञानास तयार असणारा असा आहे. त्याच्या सर्वव्यापीपणाला *‘विभु’* असे म्हणतात. आत्मा एकच नसून जगात जितक्या व्यक्ती असतात तितके आत्मे अनंत आहेत.
6) ***मन :*** न्यायदर्शन *मन हे इंद्रिय स्वीकारते*.वैशेषिक दर्शनाने मनाला द्रव्य मानले आहे,ते न्यायदर्शनास मान्य आहे.प्रत्येक व्यक्तीला मनाच्या अवस्थेनुसार वेगवेगळे ज्ञान होत असते. त्यामुळे मनेसुध्दा अनंत असतात. मन सूक्ष्म अणुस्वरुप असते.


*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*




7) ***इंद्रियांची अतिंद्रियता :*** इंद्रियांमार्फत ज्ञान होते पण स्वत: इंद्रियांचे ज्ञान मात्र अतीत असतात.ती अतींद्रिय असतात.ज्यास डोळा म्हणतात ते चक्षुरिंद्रिय नव्हे तर त्या बुबुळाच्या टोकावर चक्षुरिंद्रिय राहाते.तसेच कान म्हणजे कर्णेंद्रिय नव्हे तर कर्णविवरातील अवकाश म्हणजे कर्णेंद्रिय होय. इंद्रियांची अतिंद्रियता हा महत्वाचा शोध होय.

**प्रत्यक्ष ज्ञानाची प्रक्रिया :-**

विभु आत्म्याचा मनाशी संयोग होतो. ज्ञान होते तेव्हा आत्मा मनाशी जोडला जातो. मन कोणत्यातरी एका इंद्रियांशी जोडले जाते आणि इंद्रियाचा संबध वस्तुशी येतो व त्या वस्तुतून प्रकट होणाऱ्या अर्थाशी इंद्रिय जोडले जाते. ही साखळी व्यवस्थित असते तेव्हाच प्रत्यक्ष ज्ञान घडते.




यातील प्रत्येक दुवा आवश्यक आहे. उदाहरणार्थ आत्माच नसेल तर ज्ञान होणार नाही. कारण ज्ञान हा आत्म्याचा गुण आहे. ज्ञान होते ते आत्म्याला. त्यामुळे आत्मा मानावाच लागतो. दुसरा दुवा मन.ते मानले नाही तर आत्मा हा सर्वव्यापी असल्याने त्याला सतत ज्ञान होत राहील. मग कोणत्या ज्ञानाची भर पडली आहे किंवा नाही, याविषयी एकच गोंधळ होतो. तो टाळण्यासाठी मनाची मध्यस्थी आवश्यक असते. मन अतिसूक्ष्म, अणुस्वरुपी असल्याने ते कधी या इंद्रियांशी तर कधी दुसऱ्या इंद्रियाशी संयुक्त होत असते.या प्रक्रियेत मन ज्या इंद्रियांशी जोडले जाते त्याच इंद्रियाच्या विषयाचे ज्ञान त्याला होते. त्याचवेळी आपोआपच इतर विषयाचे ज्ञान टाळले जाते.म्हणून इंद्रिये मानावीच लागतात. इंद्रिये मानली नाही तर ज्ञान कसे होणार ? इंद्रिय भौतिक असते.

प्रत्येक ज्ञान वेगळे असते.जेवढी इंद्रिये तेवढी ज्ञाने.इंद्रिये मानावीच लागतात.प्रत्येक व्यक्तिला आत्मा,मन व इंद्रिये असतात. व्यक्ति अनंत असतात.म्हणून मनेही अनंत असतात.अनंत प्रकारे मनाकडे ज्ञानाचा प्रवाह चालू असतो.त्यामुळे ज्ञानरचनेत गोंधळ होवू नये, यासाठी मन व इंद्रिये यांचा संबंध केवळ एकाच इंद्रियापुरता मर्यादित असतो.

**प्रत्यक्षाचे प्रकार**

अशाप्रकारे प्रत्यक्ष ज्ञानाची प्रक्रिया पूर्ण होते. प्रत्येक दुवा आवश्यक असतो.प्रत्येक व्यक्तीला मनाच्या अवस्थेनुसार वेगवेगळे ज्ञान होत असते.प्रत्यक्ष ज्ञेयविषय विविध प्रकारे अनुभवास येतो.

प्रत्यक्ष ज्ञान

- 1) निर्विकल्पक
- 2) सविकल्पक
  - लौकिक
    - 1) घ्राणज
    - 2) रासन
    - 3) चाक्षुष
    - 4) स्पार्शन
    - 5) श्रावण
    - 6) मानस
  - अलौकिक
    - 1) सामान्य लक्षण
    - 2) ज्ञानलक्षण
    - 3) योगज्

**1) निर्विकल्प / निष्प्रकारक प्रत्यक्ष :-**

प्रत्यक्ष ज्ञान होण्याच्या अती पहिल्या क्षणी आपणास त्या वस्तुची जी जाणीव होते ती त्या वस्तुंचे नाव, रुप, रंग, चव इ. काहीही सांगणारी नसते.वस्तूचे अस्तित्व कळते पण अर्थ कळत नाही, तिला निर्विकल्प प्रत्यक्ष म्हणतात. या ज्ञानात कसलाही भेद, प्रकार यांचे भान होत राहते. बस्स ! फक्त ''*काहीतरी आहे* '' एवढेच कळते. हे प्रकार नसलेले एकजिनसी अभेद ज्ञान असते. अशा ज्ञानास विकल्पशून्य विकल्परहित असे **निर्विकल्प प्रत्यक्ष** म्हटले आहे.हे ज्ञान असत्य असू शकत नाही, तो भ्रमही नसतो.

2) **सविकल्प / सहप्रकारक प्रत्यक्ष :-**

त्यानंतर मात्र लगेच ज्ञेय वस्तुचे रुप, रंग इ. कळते. ती वस्तु अमुक आकाराची, प्रकारची रंगाची आहे. असे ज्ञान होते. म्हणजेच त्यात अनेक विकल्प येतात. अशा ज्ञानास **सविकल्प** किंवा सहप्रकारक ज्ञान म्हणतात.वस्तुचा अर्थ व प्रकार कळतो.

लौकिक म्हणजे भौतिक. इंद्रियाच्या मार्गाने भौतिक जगाचे ज्ञान होणे. पंच ज्ञानेंद्रिये + मन हे सहावे इंद्रिय अशी सहा इंद्रिये असल्याने **लौकीक सविकल्पक प्रत्यक्ष** सहा प्रकारचे असते.

अलौकिक म्हणजे या इंद्रियांनी न होणारे असेही प्रत्यक्ष ज्ञान असते.म्हणून त्यास *अलौकिक सविकल्पक प्रत्यक्ष ज्ञान* असे म्हटले आहे. त्याचे 3 प्रकार आहेत.

*1) सामान्य लक्षण प्रत्यासत्ति:* गायीमधील गोत्व हा सामान्य धर्म मनाला ज्ञात होतो.वृक्षत्व, अश्वत्व इत्यादि

*2) ज्ञान लक्षण प्रत्यासत्ति :* ज्ञानाच्या लक्षणाने ज्ञेयवस्तूचे ज्ञान होणे.चंदन दूर असले तरीही त्याचा सुवास

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

लांबून येतो.सुवासिकता हे चंदनाचे लक्षण.तेच बर्फ थंड,अग्नी उष्णतेबाबत.

*3) योगज् प्रत्यक्ष :* योगबलाने घटना,व्यक्ति इ.चे दूरदर्शन बसल्या जागी घडणे.हे गूढ असते. भूत, भविष्य योग्यांना ज्ञात होते.कुठल्याही इंद्रियाशिवाय होत असले तरी ते प्रत्यक्ष 'प्रमाणानेच होते, असे न्यायदर्शनाचे मत आहे.

## (2)अनुमान प्रमाणाचे स्वरूप:-

प्रत्यक्षानंतरचे ज्ञानसाधन म्हणजे अनुमान होय, अनुमान म्हणजे अचूक, योग्य अंदाज. कशाच्यातरी मागून पुढे जात राहणे म्हणजे अनुमान होय. न्यायदर्शन अनुमानाची अतिशय सविस्तर चिकीत्सा करते.त्यामुळे न्याय दर्शनास *'अनुमान शास्त्र '*असेही म्हटले जाते.एखादया वस्तूशी इंद्रियांचा प्रत्यक्ष संबंध न येता त्या वस्तूचे ज्ञान, त्या वस्तूशी नेहमी जोडलेल्या दुसऱ्या वस्तूला पाहिल्यामुळे होणे म्हणजे अंदाज करणे होय.त्यालाच आपण *अनुमान* म्हणतो.मोटार सायकलच्या आवाजावरुन आपण मोटार सायकल न पाहता सुध्दा मोटार सायकल आलेली किंवा गेलेली आहे, हे जाणतो.तसेच धूर दिसत असल्यास तेथे आग लागलेली आहे, हेही कळते.

थोडक्यात, प्रत्यक्ष ज्ञानाच्या आधारे अप्रत्यक्षाविषयी मिळविलेले ज्ञान म्हणजे अनुमान असे साधारणपणे म्हणता येईल. बस, रेल्वे अशाठिकाणी बसण्याच्या जागेवर रुमाल, पिशवी अशी वस्तु दिसली तर ती जागा आपल्या आधी कोणीतरी ताब्यात घेतलेली आहे, असे त्या व्यक्तीविषयीचे ज्ञान होते.अशा ज्ञानास ***'अनुमिती'*** असे म्हणतात. ही अनुमिती ज्या साधनाच्या आधारे केली जाते त्या साधनास 'करण' म्हणतात. म्हणून *अनुमितीचे करण म्हणजे अनुमान* होय.

थोडक्यात, ज्यास सामान्य भाषेत आपण खात्रीशीर अंदाज म्हणतो त्यास न्याय दर्शनात **अनुमिती** म्हणतात. म्हणून अनुमिती म्हणजे प्रत्यक्षावरुन अप्रत्यक्षपणे मिळविलेले ज्ञान या अनुमितीचे करण ते अनुमान होय.न्याय दर्शनकारांच्या मते, अनुमान ही एक प्रक्रिया आहे.ते विचार करण्याचे तंत्र आहे.त्या तंत्रानुसार विचार केल्यास आपणास योग्य तोच निष्कर्ष मिळतो. एका अर्थाने ते विचार करण्याचे यंत्रही आहे. या प्रक्रियेचे,तंत्राचे किंवा यंत्राचे काही भाग आहेत. हे सर्व भाग प्राप्त केल्याशिवाय व त्यांची परस्परांशी सुसंबधित जुळणी केल्याशिवाय योग्य निष्कर्ष प्राप्त होऊ शकत नाही, असे न्याय दर्शनकारांचे म्हणणे आहे.

अनुमानाची रचना पुढील प्रमाणे होते.

1) व्याख्या :- लिंग-लिंगी संबध
2) पाच पदार्थ
3) अनुमानाची दोन अंगे
4) अनुमानाचे प्रकार
5) तर्क दोष / हेत्वाभास

*1) व्याख्या :- लिंग-लिंगी संबध :-*

प्रत्यक्षाच्या आधारे अप्रत्यक्षाचे ज्ञान म्हणजे अनुमिती. या अनुमितीचे कारण म्हणजे अनुमान केली जातांना आपणासमोर कोणतीतरी खूण किंवा चिन्ह असते. उदा. बसमधील सीटवर टाकलेला रुमाल, पिशवी, किंवा समोरच्या डोंगरावर दिसणारा धुर अशा खूणेला, चिन्हाला *'लिंग'* असे म्हणतात. त्या लिंगाच्या आधारे ज्याचा अनुमिती होते, त्यास *'लिंगी'* असे म्हणतात. म्हणजे लिंग हे ज्याचे चिंन्ह आहे, त्यास *लिंगी* असे म्हणतात. धूर या लिंगाचे अग्नी हा लिंगी आहे. अगदी त्याप्रमाणे बसमधील सिटवरील पिशवी या लिंगाचे तिची मालक व्यक्ती ही लिंगी आहे. अशारितीने लिंगावरुन लिंगीचे ज्ञान मिळवीणे म्हणजे अनुमिती थोडक्यात लिंग-लिंगी = लिंग-लिंगी सबधी म्हणजे अनुमिती या अनुमितीचे कारण म्हणजे अनुमान होय.

जेव्हा प्रत्यक्ष ज्ञान संपते, तेव्हा अनुमान सुरु होते. अनुमान हे लोकोपयोगी साधन आहे. म्हणून त्याची जास्त चर्चा न्यायशास्त्र करते. दैनंदिन जगण्यात आपणांस नेहमीच हा लिंग-लिंगी संबध म्हणजे अनुमिती किंवा अनुमान अनुभवास येत असतो. या अनुमानाचे विशिष्ट रितीचे तंत्र, मंत्र व यंत्र असून पाच अवयवांनी ते रचले गेले आहे.ते अवयव किंवा पदार्थ पुढीलप्रमाणे :

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

### *2) अनुमानातील पाच पदार्थ :-*

अुनमान प्रक्रियेत पाच पदार्थ आहेत. पदार्थ म्हणजे पदाचा शब्दाचा अर्थ.अशी पाच पदे आहेत. ही पाच पदे अनुमानाचे यंत्र रचतात. उदाहरणार्थ 'धूर तेथे अग्नी ' या अनुमानातील पाच अवयव :

1) *हेतू :-* चिन्ह, खूण, लिंग (धुर)
2) *साध्य :-* हेतूच्या आधारे सिद्ध होणारे (अग्नी)
3) *पक्ष :-* ज्याठिकाणी साध्य, सिदध करावयाचे ते ठिकाण (डोंगर)
4) सपक्ष :- ज्याठिकाणी साध्य आहे, असे निश्चितपणे माहित असते, ते निश्चित ठिकाण (स्वयंपाकघर).
5) *विपक्ष :-* ज्याठिकाणी साध्य निश्चितपणे नाही, असे म्हणता येत ते ठिकाण (तलाव, समुद्र).

उदा. धूर तेथे अग्नी असे म्हणणे म्हणजे धुरावरुन अग्नीचे अनुमान करणे. म्हणजे 'जेथे जेथे धूर असतो तेथे तेथे अग्नी असतोच' असे सिध्द करावयाचे आहे. हे पुढील घडते.

धूर तेथे अग्नी यात धूर हा *'हेतू'*, अग्नी हे *'साध्य'* आहे, आणि धूर समोरच्या डोंगरावर दिसतो . म्हणून तो डोंगर हा *'पक्ष'* आहे. आता समोरच्या डोंगरावर धुर दिसतो म्हणून अग्नीसुध्दा तेथेच असला पाहिजे. असे सिध्द करावे लागते. ते होण्यासाठी निश्चित माहिती द्यावी लागते की, जेथे अग्नी असतोच तो *सपक्ष* म्हणजे स्वंयपाकघर, शेकोटी इ. तसेच जेथे अग्नी नाही, तो *विपक्ष* असेही निश्चितपणे सांगता येते, ठिकाण म्हणजे तलाव, नदी, जलाशय किंवा समुद्र.

हे पाच पदार्थ अनुमानाचे तंत्र आणि यंत्र तयार करतात. नैयायिकांच्या मते, हेतूने (धूर) नेहमी पक्षावर (डोंगर) व सपक्षावर (स्वयंपाकघर) रहावे. तरच धूर तेथे अग्नी हे अनुमान सिध्द होते. हेतूने कधीही विपक्षावर राहू नये. तो चुकीचा आहे.

जर हेतू पक्षावर व सपक्षावर राहत असेल *तर आणि तरच* अशा हेतूला ***सद्हेतू*** असे म्हणतात. आणि हेतु जर विपक्षावर राहत असेल किंवा मुळ हेतु नसतांना हेतुसारख्या दिसणारा दुसराच काहीतरी असेल तर त्यास ***हेत्वाभास*** किंवा ***दुष्टहेतू*** असे म्हटले आहे.

थोडक्यात निर्दोष हेतू म्हणजे **सद्हेतू** तर दोषयुक्त हेतु म्हणजे ***हेत्वाभास*** होय.

### *अनुमानाचे प्रकार :-*

अनुमानाने होणारे ज्ञान हे इतरांना सांगण्याची इच्छा निर्मान होते. एकदा ज्ञान झाले की ते इतरांनासाठीही उपलब्ध असले पाहिजे. समाजासाठीही ते उपयोगी पडले पाहिजे,हे ज्ञान स्वत:ला व इतरांना फलप्राप्ती देणारे असले पाहिजे. अशी न्यायदर्शनाची भूमिका आहे.

1) स्वार्थानुमान 2) पदार्थानुमान

### *अ) स्वार्थानुमान :-*

एखाद्या व्यक्तीस स्वत:पुरते होणारे अनुमान म्हणजेच स्वार्थानुमान.ही एक विशिष्ट प्रकारची केवळ स्वत:पुरती असलेली प्रक्रिया आहे.जसे शेकोटी उसाचे गुऱ्हाळ ,स्वयंपाकघर इ. ठिकाणी धूर आणि अग्नी यांचे साहचर्य एखादा माणूस पाहतो आणि जेथे जेथे धुर असतो तेथे तेथे अग्नी असतो *(यत्र यत्र धूम: तत्र वत्र वन्ही:)* असे ज्ञान त्या ामाणसाला होते.ते त्याच्या स्मरणात राहते. पुढे कधीतरी अन्यत्र धूर पाहून त्याला या गोष्टीची आठवण होते. तो माणूस अनुमान करतो. पण हे ज्ञान त्याच्या स्वत:पुरते असते. म्हणून त्यास *'स्व + अर्थ + अनुमान = स्वार्थानुमान'* असे म्हणतात.

थोडक्यात व्यक्तीला होणारे स्मरण आणि त्यायोगे होणारे अनुमान म्हणजे स्वार्थानुमान होय.

### *ब) पदार्थानुमान :- (पंचावयवी वाक्य)*

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

'पर + अर्थ + अनुमान = परार्थानुमान. एकदा स्वार्थानुमान झाले की ते इतरांनाही त्या व्यक्तीचे ज्ञान करुन देण्याची इच्छा साहजिकच व्यक्तीला होते. त्यासाठी अर्थातच भाषा वापरावी लागते. भाषेत वाक्ये, विधाने इ. घटक असतात. दैनंदिन बोलण्यात आपण भाषेची कशीही ओढताण करतो. एखादा शब्दही बोलण्यास पुरतो. क्वचित अलंकारीकही भाषा वापरली जाते. पण नैय्यायिक अशी भाषा करीत नाहीत. त्यांच्यामते, ज्ञान ही मोठ्या कष्टाने मिळविलेली गोष्ट असते. त्यामुळे भाषेची उधळण न करता मोजक्या शब्दात व वाक्यातच आपणांस झालेले ज्ञान इतरांना देण्यावर भर दिला जावा. त्यासाठी ते वाक्याची एका विशिष्ट प्रकारे मांडणी करतात. अशी पाच वाक्ये आहेत.ती वरवर पाहाता वेगवेगळी पाच वाक्ये दिसत असली तरी अनुमान म्हणून ही सर्व वाक्ये मिळून एकच बनते. म्हणून त्यास ***'पंचावयवी वाक्य'*** म्हणतात. हे वाक्य इतरांना अनुमान करुन देण्यास उपयुक्त ठरते. म्हणून त्यास परार्थानुमान असे नाव आहे, ही वाक्ये / अवयव पुढील प्रमाणे

1) प्रतिज्ञा 2) हेतू 3) उदाहरण वाक्य 4) उपनय 5) निगमन

**1)** प्रतिज्ञा:- प्रतिज्ञा म्हणजे साध्याचे सिध्दीपुर्वक कथन करणे, उदा - त्या पर्वतावर अग्नी आहे.

**2)** हेतू :- ज्या लिंगाच्या आधारावर साध्य सिध्य केले जाते, ते लिंग किंवा चिन्ह उदा-धूर

**3)** उदाहरण वाक्य :- हेतु आणि सिध्दी यांचा संबंध साधणारे एखादे उदाहरणाचे वाक्य. हे वाक्य प्रतिज्ञा पूर्ण करण्यास उपयोगी पडणारे असते. जसे स्वयंपाक घरातील धूर आणि अग्नी.

**4)** उपनय :- उपनय म्हणजे जवळ आणणे. (नय म्हणजे बाजू,दृष्टिकोन व उप म्हणजे जवळ). धूर व अग्नी यांचा संबंध सिध्द करण्यासाठी व्याप्ती लागू पडते, असे दर्शविणे, म्हणजे या पर्वताच्या ठिकाणी अग्नीयुक्तंच धुर आहे, असे दाखविणे.

**5)** निगमन :- निगमन म्हणजे खाली येणे. अनुमिती झाले म्हणजे अनुमान झाले की आपण पक्षाच्या ठिकाणी म्हणजे डोंगराच्या ठिकाणी उतरतो. *जेथे जेथे धुर असतो तेथे तेथे अग्नी असतो* या व्यापक स्वरुपाच्या सामान्य सिध्दांतापासून आपण या पर्वतावरील धूर पाहून *येथे अग्नी असणार* अशा विशिष्ट ठिकाणी उतरतो,निष्कर्ष काढतो. यास *निगमन* म्हणतात. मोठयाकडून छोटयाकडे येणे म्हणजे निगमन होय.

पाच अवयव सांगितले की, त्याची पुढीलप्रमाणे रचना करावी लागते, तरचं परार्थानुमान मिळते. ते असे : परार्थानुमानाची रचना :-

**1)** *प्रतिज्ञा :-* त्या पर्वतावर अग्नी आहे,

**2)** *हेतु :-* कारण तेथे धुर आहे,

**3)** *उदाहरण :-* जसे स्वयंपाक घर,

**4)** *उपनय :-* पर्वताची गोष्ट स्वंयपाकघरासारखीच आहे.

**5)** *निगमन :-* त्या पर्वतावर अग्नी आहे.

प्रतिज्ञा, हेतु, उदाहरण, उपनय, निगमन असे पाच अवयव असलेले हे सगळे मिळून एकच वाक्य आहे. म्हणून त्यास ***पंचावयवी वाक्य*** असे म्हणतात.

न्यायदर्शनाच्या मते, आपण जर कोणताही युक्तीवाद किंवा आपले म्हणणे या अनुमानयंत्रात बसविले, आपल्या म्हणण्याचे अवयव निश्चित केले तर आपणांस हवा असलेला योग्य निष्कार्ष मिळु शकतो. प्रतिपक्षालाही या अनुमान प्रक्रियेतील वस्तुनिष्ठा मान्य असल्याने तो सुध्दा येणारा निष्कर्ष मान्य करतो, ही अनुमान प्रक्रिया आपणांस योग्य निष्कर्षाकडे नेते म्हणून अशा अनुमानास / पंचावयवी वाक्यास **न्याय** असे म्हणतात. संस्कृत मधील 'नी' या धातुचा अर्थ नेणे असा असून 'नी' पासून न्याय हा शब्द बनतो.या न्यायावरच, तर्कावरच हे दर्शन भर देत असल्यामुळे या दर्शनास *न्यायदर्शन* किंवा *न्यायशास्त्र* असे म्हणतात.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

*न्यायदर्शनातील ज्ञानाची संकल्पना*

नैय्यायिकांच्या मते, 'ज्ञान' हा आत्माचा गुण असून ज्ञान ही त्यांच्या मते एक वस्तु आहे. तिचे दोन भाग आहेत. 1)अनुभव 2) स्मृती आधी अनुभव येतो, मगचं त्याचे स्मरण होते.ज्याचा अनुभव नाही, त्याचे स्मरण सुध्दा नाही. अनुभव हा यथार्थ व अयथार्थ असा दोन प्रकारचा असतो. यथार्थ अनुभव म्हणजे सत्य ज्ञान व अयथार्थ अनुभव म्हणजे असत्य व चुकीचे ज्ञान त्यालाच *भ्रम ज्ञान* म्हणतात.

यथार्थ ज्ञान एका विशिष्ट स्वरुपाचे असते. नैय्यायिकांच्या मते, कोणत्याही अनुभवाचे किंवा ज्ञानाचे दोन भाग असतात.

1) ज्या कशाचे ज्ञान होते ते - ज्ञेयवस्तू
2) ज्या रितीने ते ज्ञान होते ती रिती - ज्ञानरिती.

ज्या कशाचे ज्ञान होते, त्या ज्ञेय वस्तूस ***'इदम्'*** असे म्हणावयाचे
तर ज्यारितीने हे ज्ञान होते त्यास ***'आकार'*** असे म्हणावयाचे.

एखादी वस्तु अस्तित्वात असते तेव्हा ती नुसतीचं अस्तित्वात असते असे नाही तर तिच्या अस्तित्वात असण्याची विशिष्ट पध्दतीसुध्दा असते. ती पध्दती आणि ज्ञान जर एकरूपच असतील तर आणि तरच ते ज्ञान यथार्थ असते. म्हणजेच ज्ञानाचा विषय व ज्ञानाचा आकार तंतोतंत जुळणारा असला पहिजे.

थोडक्यात, आपल्या अनुभवातील इदम आणि आकार जेव्हा एकरूपच असतात, तेव्हा होणारे ज्ञान सत्य ज्ञान किंवा यथार्थ ज्ञान असते. असे जेव्हा नसते,तेव्हा त्यास ***भ्रम*** असे म्हटले जाते.

**भ्रमाचे स्वरुप**

इदम् आणि आकार समसमान जुळले तरच ज्ञान सत्य असते. उदा. समुद्रकिनारी आपण गेलो असतो तर आपणास एकदमच चांदीचे तुकडे आढळतांना दिसतात. आपण धावत जाऊन ते बघतो मग लक्षात येते की, तो शिंपला आहे. जेव्हा शिपंल्याचे (शुक्ती) ज्ञान शिंपला म्हणून होते, ते चांदीचे (रजत) ज्ञान नसते. शुक्ती ज्ञानात इदम् आणि आकार दोन्ही शुक्ती म्हणूनच अनुभवास आल्यास की त्यास यथार्थ ज्ञान म्हणता येईल.

पण आधी आपणास चांदी भासते.नंतर शिंपल्याचे ज्ञान होते. या चांदीच्या ज्ञानाला भ्रम असे म्हणतात. आता, प्रश्न असा की समोर शिपंले असतांना आणि चांदी नसतांना चांदी भासतेचं कशी? हीच *भ्रमाची समस्या* आहे. असा भ्रम का होतो ?

याचे नैय्यायिकांचे उत्तर असे की भ्रमात्मक ज्ञानाच्या ठिकाणी जो *इदम्* चा अंश असतो, त्यासंबधी भ्रम होत नाही. तो अंश जसाच्या तसा असतो तो कायम राहतो. भ्रम होतो तो आकाराबाबत ! नंतर ज्यावेळेस हे शिंपले आहेत चांदी नाही, असे कळते. त्यावेळेस रजत - चांदी या ज्ञानाला बांधा आलेली असते, ते गायब झालेले असते !! म्हणजे अनुभव येतो तो शिंपल्याचा पण ज्ञान होते चांदीचे. असा भ्रम का होतो?

यात एक सूक्ष्म गोष्ट घडते. भ्रम होतो म्हणजे स्मृतीज्ञान होत असते.स्मृती कशाची होते ? तर पूर्वानुभवाची ! तो कोठून मिळाला? तर सोनाराच्या दुकानातून. आपण पुर्वी कधीतरी सोनाराच्या दुकानात चांदी पाहिलेली असते.पण विसरून गेलेलो असतो.त्याचेच स्मरण आपणांस शिपंले पाहतांना होते.शिंपल्याच्या ठिकाणी चांदी दिसते. असते शिंपले पण चांदीचे ज्ञान स्मरणाने होते.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

सोनाराच्या दुकानातील अगदी पहिल्या चांदीच्या अनुभवाचे ज्ञान सुध्दा खरेच असते.आता मिळत असलेले शिंपल्याचे ज्ञान सुध्दा खरेच असते.[3] शिपंल्यात ते मिसळते. शिंपल्याच्या जागी त्या क्षणाला चांदी नसली तरीही *अन्यत्र कोठे तरी ती असतेच* म्हणूनच रजत ज्ञानास *अन्यथा* असे म्हणतात. ही ख्याति, म्हणून **अन्यथा ख्याति** होय.

थोडक्यात आत्ता येथे शिंपले (शुक्ती) असले तरी अन्यत्र (सोनाराच्या दुकानात) रजत असते. तेच फक्त भासते.नसते, पण अवतरते.इदम् आणि आकार दोन्हीही वास्तव आहे.येथे फक्त एकत्र नसतात. ख्याती होते पण अन्यथा होते असे न्यायदर्शन सांगते.

## (3)शब्द



शब्द म्हणजे आप्त व्यक्तिने दिलेली माहिती. शब्द म्हणजे केवळ एखादा शब्द असे नव्हे. शब्दावर विश्वास ठेवणे अथवा न ठेवणे, याचा अर्थ संबंधित व्यक्तिने दिलेल्या माहितीवर विश्वास ठेवणे अथवा न ठेवणे. विश्वासार्ह माहिती केवळ 'आप्तच' देवू शकतो. **''आप्तवाक्यं शब्दम् । आप्तस्तु यथार्थवक्ता ''** ही 'शब्द' या संकल्पनेची व्याख्या न्याय दर्शनाने केली आहे.

येथे 'आप्त' म्हणजे नातेवाईक नव्हे, तर सत्यवचन करणारी, खरे बोलणारी जगातील कोणतीही व्यक्ति. मग ती कोणत्याही जातीधर्माचीवर्णाची देशाची असो. ती खरे बोलत असेल तर आपली आप्त असते. (आणि नातेवाईक खोटे बोलत असतील तर ते नातेवाईक असतील पण आप्त असणार नाहीत.) 'यथार्थ वक्ता' याचा अर्थ सत्य बोलणारी व्यक्ति. सत्य बोलणे हा आप्त असण्याचा निकष होय.आप्ताने उच्चारलेले शब्द याचा अर्थ आप्ताने केलेले विधान.म्हणून 'आप्तवाक्य शब्दम् ' अशी व्याख्या न्यायदर्शन करते.

तुकाराम महाराजांचा एक अभंग आहे. त्यात त्यांनी 'शब्द' या ज्ञानाच्या वस्तूचे वर्णन केले आहे. ते म्हणतात,

''आम्हा घरी धन शब्दाचीच रत्ने
शब्दाचीच शस्त्रे यत्ने करु
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन
शब्दे वाटू जन धन जन लोका ''

'शब्द' हे ज्ञानाचे साधन म्हणून जवळपास सर्व दर्शनांनी मान्य केले आहे, तथापि पूर्वमीमांसा दर्शनाने शब्दाला आणखी उच्च दर्जा देवून त्याचे सविस्तर वर्णन केले आहे. शब्दप्रमाणास ते 'शाब्दबोध' म्हणतात. शब्दाच्या मदतीने ते वेदांचे सत्यत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात.वेदातील प्रत्येक वाक्य ते सत्य समजतात. वर्ण, जातीव्यवस्था आणि स्त्री-पुरुष लिंगभेद करावा, असे वेदवचन आहे. ते मीमांसा दर्शन सत्य मानते.

मात्र चार्वाक तत्त्ववेत्त्यांनी प्राचीन काळी आणि आधुनिक कालात म. फुले, डॉ. आंबेडकर , आगरकर इत्यादी विचारवंतांनी वेदांना, त्यांच्या सत्यत्वाला म्हणजेच व्यापक अर्थाने 'शब्द' प्रामाण्याला आव्हान दिले आणि ते नाकारले. आंबेडकरांचे कार्य इतके महान ठरले की लोककवी बाबुराव बागुल यांनी ''वेदाआधी तू होतास''अशी कविता आंबडेकरांचे वर्णन करण्यासाठी केली.

**ब) पाश्चात्य :** इंद्रियानुभव, विवेकबुद्‌धि

## लॉकचे मत : अनुभववाद

लॉकच्या मतानुसार आपला सारे ज्ञान केवळ अनुभवापासूनच सुरु होते. लॉकच्या मते मानवी मन हे कोऱ्या पाटी[4] सारखे असून अनुभवाने माणूस त्यावर लेखन करतो.जग व जगातील प्रत्येक घटकाचे, घटनेचे ज्ञान केवळ अनुभवानेच होते.त्यामुळे आपल्या मनात 'जन्मजात कल्पना नसतात'***(No innate ideas).***सर्व कल्पना बाहेरुन मनात उमटतात.जगाचा अनुभव ज्ञानेंद्रियांनी येतो, हे खरे आहे.पण लॉकच्या मते या अनुभवास आपण 'अनुभव'म्हणणे चुकीचे

---

[3] **ज्ञान नेहमी सत्यच ज्ञान असते, हा न्यायदर्शनाचा सिध्दान्त आहे, त्यानुसार दोन्ही ज्ञाने सत्यच असतात.**
[4] लॉक मनाला कोरी पाटी ( **blank tablet - *tabula rasa***) म्हणतो.

असून त्यांना 'इंद्रिय संवेदन '*(sensations)* किंवा 'वेदन' म्हणणे योग्य आहे.आपल्या साऱ्या कल्पना आणि संवेदना आपणास अनुभवातूनच लाभतात.त्यांनाच सामान्यत: 'कल्पना'(Idea) म्हंटले जाते. या कल्पनारुपानेच ज्ञानप्राप्ती होते.या कल्पनेत तीन गोष्टी असतात :

1) इंद्रिय संवेदने (Ideas of Sensations)
2) या संवेदनांच्या प्रतिमा (Images )
3) आत्मनिरीक्षण किंवा अंर्तनिरीक्षण.

लॉकच्या मते जगाचे ज्ञान संवेदनाद्वारा मिळते,त्यांच्या प्रतिमा मनात तयार होतात आणि मनातील विचार, विकार इत्यादीचे ज्ञान अंर्तनिरीक्षणाने होते.थोडक्यात मानवी ज्ञानाचा विषय कल्पनाच असतात.त्यांचे साक्षात ज्ञान होते.खुद्द मनाचेही ज्ञान साक्षात होते.ते अर्थातच अंर्तनिरीक्षणानेच होते.

या साऱ्या कल्पना अमूर्त असतात आणि जगात वस्तू नसतात तर फक्त वस्तूच्या संवेदनाच असतात. कोणतेही ज्ञान वस्तूचे - म्हणजेच जगाचे,होत नाही तर फक्त वस्तूच्या संवेदनांचेच होते.वस्तू मूर्त असते तर संवेदना अमूर्त असतात आणि त्यापासून अमूर्त कल्पना तयार होवून त्यांचे साक्षात ज्ञान होते.

थोडकयात वस्तू मूर्त पण कल्पना अमूर्त आहेत.त्याच ज्ञानाचा विषय आहेत.त्यांचा अनुभव येतो.मनाची कोरी पाटी याच कल्पनांनी लिहीली जाते, असा लॉकचा सिध्दान्त[5] आहे.

[5] जग आपल्याला जे काही सांगू इच्छिते तेच आपण पाहिले पाहिजे.जगाचे आपण तटस्थ आणि निरपेक्ष मनाने निरीक्षण केले पाहिजे.जगाकडून मिळणाऱ्या कोणत्याही माहितीचे आपण ती जशी आहे तशीच स्वागत केले पाहिजे.त्या माहितीवर आपण कोणतेही संस्कार केले किंवा त्यात बदल केले तर नको त्या कल्पना सुचत राहातात . मग आपली कल्पनाशक्ति भटकत राहाते आणि चमत्कारीक विचारांना जन्म देते.